# ग्रामीण अर्थव्यवस्थेत स्वयंसहाय्यता महिला बचत गटाचे आर्थिक योगदान

**प्रा.निता गिरी**
अंजनगाव सुर्जी

**प्रास्ताविक :**

आदी काळापासून कौटूंबिक विकासात स्त्रीचे स्थान अनन्य साधारण असे प्रस्थापित झाले आहे. तथापी हे स्थान घर, कुटूंब आणि समाजापूरते मर्यादित राहीले. संधी, प्रसंग, समाजरचना तथा सामाजिक मूल्ये ह्यामुळे स्त्रीयांना व्यक्तीमत्व विकासासाठी वाव मिळाला नाही, असे म्हटल्यास वावगे ठरु नये. मात्र स्त्रीची ''चुल आणि मुल'' ही मर्यादाकक्षा विशाल होऊन तीची घर, कुटूंब, समाज ह्याहीपेक्षा राष्ट्र व देशापर्यंत विकासाच्या दिशा झपाट्याने वाढत गेल्या.

स्त्रीयांच्या मुख्यत्वे आर्थिक सक्षमीकरणासाठी केंद्र, राज्यशासन तथा निरनिराळ्या यंत्रणांच्या माध्यमातून योजना राबविल्या जात आहेत. तसेच याबद्दल त्यांना सविस्तर माहिती मिळवून देणे ही काळाची गरज ठरावी. या सर्व योजनेत बचत गट संकल्पनेचे स्थान अनन्य साधारण ठरले. स्त्री सबलीकरणासाठी स्वयंसहाय्यता गटाच्या रुपाने व्यापक सामाजिक संपर्काचे क्षेत्र उपलब्ध झाल्याने त्या इतरही बाबतीत जागरुक होत आहेत.

## उद्दीष्टे –

**नमुना बचत गटांनी निवडलेल्या उद्योगाविषयी माहिती संकलित करणे.**

1. महिला सक्षमीकरणातील बचत गटाच्या योगदानाची चिकीत्सा करणे.
2. महिला बचत गटाच्या माध्यामातून साकारलेल्या उद्योगापासून झालेल्या फायद्याचे अध्ययन करणे.

## संशोधन पध्दती :

निवडलेला संशोधन प्रकार हा सर्वेक्षणावर आधारित सुक्ष्म अध्ययन आहे. अमरावती जिल्ह्यातंर्गत निवडलेल्या सात तालुक्यातील 35 खेड्यामधील बचत गटातील महिला उद्योजकांचा प्रथम नमुना म्हणून विचार करण्यात आला. संशोधनासाठी आवश्यक संख्या निवडीसाठी उद्योजक महिलांची यादी तयार करण्यात आली निवडलेल्या खेड्यात एकूण 700 बचत गट होत. 700 बचत गटापैकी 50 म्हणजे 350 महिला बचत गटाची निवड करण्यात आली व प्रत्येक बचत गटामधून एक या प्रमाणे हेतूपूरस्पर 350 महिला उद्योजक प्रस्तुत संशोधनासाठी निवडण्यात आल्या. नमुना निवड आराखड्यात दिलेली आहे.

### नमुना निवड आराखडा

| जिल्हा | एकूण तालुके | संशोधनासाठी निवडलेल्या तालुक्यांची संख्या | निवडलेल्या तालुक्यातील खेड्यांची संख्या | निवड केलेली खेडी | एकूण बचत गटांची संख्या | निवड केलेले बचत गट | एकूण महिला सदस्य | संशोधनासाठी निवडलेल्या महिला उद्योजक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अमरावती | 14 | 7 (50)% | 790 | 35 (2.5)% | 700 | 350 (50)% | 7000 | 350 (5)% |

अमरावती जिल्ह्यातील 50 तालुक्के, नमुना तालुक्यातील 2.5 गावे आणि एकूण नमुना बचत गटातील सदस्यांच्या 5 सदस्य हा नमुना एकूण लोकसंख्येशी पुरेसा प्रतिनिधीक आहे. तसेच नमुना निवडतांना यादृश्चिक नमुना निवड पध्दतीचा वापर केल्यामुळे ही निवड एकूण लोकसंख्येशी प्रतिनिधीक ठरेल असा विश्वास आहे. प्रश्नावलीच्या माध्यमातून नमुना बचत गटांची माहिती संकलित केलेली आहे. संकलित तथ्य विश्लेषणानंतर अहवालाच्या स्वरुपात हा लेख सादर केलेला आहे.

नमुना महिला उद्योजिकांचे सक्षमिकरण, सामुग्री विश्लेषण व निष्कर्ष :

निवडलेल्या महिला उद्योजकांकडून मुलाखतीनुसार मिळालेल्या माहितीच्या आधारे त्यांनी निवडलेले उद्योग खालील प्रमाणे आहेत.

| अ.क्र. | अंगिकारलेल्या उद्योगाचे स्वरुप | प्रतिवेदक महिलांचा प्रतिसाद | |
|---|---|---|---|
| | | संख्या (N=350) | प्रतिशत |
| 1 | गृहउद्योग | 21 | 06.00 |
| 2 | कापड उद्योग | 16 | 04.58 |
| 3 | शिवणकाम | 07 | 02.00 |
| 4 | जनरल स्टोअर्स | 13 | ०3.72 |
| 5 | दुग्ध व्यवसाय | 124 | 35.43 |
| 6 | शेती | 21 | 03.00 |
| 7 | शेळीपालन | 136 | 38.85 |
| 8 | धान्य प्रक्रिया उद्योग | 09 | 02.58 |
| 9 | इतर | 09 | 00.85 |
| | एकूण | 350 | 100.00 |

वरील तक्यातील माहितीवरुन जास्तीतजास्त म्हणजे 136 महिला उद्योजक शेळीपालन हा उद्योग करतात. तर त्या खालोखाल 124 प्रतिवेदक महिला उद्योजक दुग्धव्यवसाय करीत असल्याचे दिसते. शेती आणि गृहउद्योग करणाऱ्या प्रतिवेदक महिलांची संख्या सारखीच आढळून आली. कापड उद्योग, शिवणकाम, जनरल स्टोअर्स धान्य प्रक्रिया यासारखे उद्योग करणाऱ्या प्रतिवेदक महिला उद्योजकांची संख्या अनुक्रमे 16, 7, 13 व 9 असल्याचे तक्त्यावरुन स्पष्ट होते.

## महिला सक्षमिकरणातील बचत गटाचे योगदान :

प्रतिवेदक महिलांना बचत गटापासून झालेले फायदे –

| अ.क्र. | बचत गटापासून झालेल्या फायद्याचे वर्गीकरण | प्रतिवेदक महिलांचा सहभाग | |
|---|---|---|---|
| | | संख्या (N=350) | प्रतिशत |
| 1 | महिलांचे संघटन होण्यास मदत झाली | 135 | 38.6 |
| 2 | बचत व काटकसरीची सवय लागली | 203 | 58.0 |
| 3 | अत्यावश्यक गरजेसाठी कर्ज वेळेवर उपलब्ध झाले | 285 | 81.4 |
| 4 | बँक व्यवहाराबद्दल माहिती मिळाली | 198 | 56.6 |
| 5 | कमी व्याजदरात कर्ज प्राप्त झाले | 135 | 38.6 |
| 6 | परस्पर सहकार्य व विश्वास निर्माण झाला | 293 | 83.7 |
| 7 | निरनिराळ्या शासकीय योजनाबद्दल माहिती मिळाली | 272 | 77.7 |
| | **एकूण** | | **100** |

वरील तक्क्यातील माहितीवरुन जास्तीत जास्त 293 महिलांना परस्पर सहकार्य व विश्वास निर्मितीचा फायदा झाला. त्या खालोखाल 285 महिलांना अत्यावश्यक गरजेसाठी वेळेवर कर्ज उपलब्ध झाल्याचे सांगितले. बचत व काटकसरीची सवय 203 महिलांना लागली तर 198 महिलांना बँक व्यवहाराबद्दल माहिती होण्यास बचत गट कारणीभूत ठरले. बचत गटांमुळे 272 प्रतिवेदक महिलांना निरनिराळ्या शासकीय योजनाबद्दल माहिती मिळाली. महिलांचे संघटन होण्यास झालेली मदत व तुलणात्मक दृष्ट्या कमी व्याजदरात कर्ज प्राप्तीची सुविधा झाल्याचा फायदा सांगणाऱ्या प्रतिवेदक महिला उद्योजकांची संख्या सारखीच म्हणजे 135 असल्याचे वरील तक्त्यातील माहितीवरुन दिसते.

## उद्योगापासून झालेले फायदे :

| अ.क्र. | उद्योग/व्यवसायापासून होणाऱ्या फायद्याचे वर्गीकरण | प्रतिवेदक महिलांचा प्रतिसाद | |
|---|---|---|---|
| | | संख्या (N=350) | प्रतिशत |
| 1 | घरगुती अडचणी भागविता आल्या | 135 | 38.56 |
| 2 | कौटूंबिक स्वास्थ टिकविता आले | 03 | 00.85 |
| 3 | सण, वार, कार्ये योग्यरित्या पार पाडता आले | 102 | 29.15 |
| 4 | कर्जाची परतफेड करता आली | 98 | 28.00 |
| 5 | व्यवसायात पैसे गुंतवूण व्यवसाय वाढविता आला | 12 | 03.43 |
| | एकूण | 350 | 100 |

यापुर्वी प्रतिवेदक महिला उद्योजिकांकडून त्यांना बचत गटातील सहभागामुळे झालेले फायदे जाणून घेतल्यानंतर त्यांनी अवलंबिलेल्या उद्योगामुळे झालेले फायदे विचारले असता महिलांनी वरील माहिती दिली. तक्त्यातील माहितीवरुन 135 प्रतिवेदक महिला घरगुती अडचणी मागवू शकल्या तर 102 महिलांना उद्योगापासून झालेल्या आर्थिक प्राप्तीमुळे कौटूंबिक सण, वार, कार्ये योग्य प्रकारे पार पाडता आले. कर्जाची परतफेड करता आली. मिळालेल्या आर्थिक फायद्यामुळे उद्योगामध्ये पैसे गुंतवूण उद्योग वाढविता आला तथा कौटूंबिक स्वास्थ टिकविता आले. अशा प्रकारचे फायदे झाल्याचे सांगणाऱ्या प्रतिवेदक महिला उद्योजकांची संख्या अनुक्रमे 98, 12 आणि 3 होती.

## निष्कर्ष :

मुलाखतीमध्ये महिला उद्योजकांनी दिलेल्या प्रतिसादानुसार आर्थिक योगदान मोलाचे ठरते. लहान–सहान कारणासाठी सावकाराच्या कर्जावर विसंबून राहणाऱ्या महिला आता स्वतःच्या कमाईमधुन बचत करीत कर्ज मिळवू लागल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून विविध प्रकारचे उद्योग स्थापन करुन आर्थिक दृष्ट्या सक्षम झाल्या आहेत.

स्वयंसहाय्यता गटामुळे महिलांची आर्थिक उन्नती तर झालीच शिवाय समाजिक व राष्ट्रीय कार्यक्रमात देखिल त्यांचा सहभाग वाढलेला आहे. बचत गटाच्या माध्यमातून स्वतःला मोठे बनवत आमच्या महिलांनी कुटूंबाला आणि गावाला देखिल मोठे बनविले आहे. त्यांचा कौटूंबिक, सामाजिक व आर्थिक दर्जा उंचावलेला आहे. म्हणजेच ग्रामीण अर्थव्यवस्थेत स्वयंसहाय्यता महिला बचत गटाचे योगदान मोलाचे ठरते.

**प्रा.निता आर.गिरी**

श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय,

अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती

मो.9970110529

# '' संदर्भसूची


1. एम.यु.मुलाणी (2006), '' स्वयंसहाय्यता महिला बचत गट''

2. मेघा दुभाषी (2005), ''ग्रामीण उद्योजकता आणि स्वयंसहाय्यता गट''

3. खुरुद (2009), ''स्वर्णजयंती ग्रामस्वरोजगार योजनेची प्रगती''

4. रविंद्र चव्हाण (1999), ''आता भाकरी कोण करणार''